## ।। विद्यापीठ गीत ।।

एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

– *कुसुमाग्रज*

**सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या**
**आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित**

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**'ज्ञानगंगोत्री', गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक – ४२२ २२२.**
**(महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले)**

## ( C-31 )

## बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र
## (ECCE)

## स्वाध्याय व प्रात्यक्षिक प्रश्नपुस्तिका
**(Home Assignment and Practical Question Book)**

**शैक्षणिक वर्ष २०१६–२०१७**
**शिक्षणशास्त्र विद्याशाखा**

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## कुलगुरू : प्रा. (डॉ.) दिलीप म्हैसेकर

### शिक्षणक्रम समन्वयक व संपादन

डॉ. डी. डी. पवार
सहायक प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

### मार्गदर्शन

डॉ. संजीवनी महाले
प्रभारी संचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

### स्वाध्याय लेखक

| | | |
|---|---|---|
| डॉ. संजिवनी महाले<br>सहयोगी प्राध्यापक | : १. | (EDU131) बालविकासाची मूलतत्वे,<br>बालविकास व बालमानसशास्त्र |
| प्रा. सोनुने एस.एस.<br>सहायक प्राध्यापक | : २. | (EDU132) बालशिक्षण : बालआहार व आरोग्य |
| डॉ. डी. डी. पवार<br>सहायक प्राध्यापक | : ३. | (EDU134) बालशिक्षणाचे व्यवस्थापन व<br>मूल्यमापन |
| डॉ. विजया पाटील<br>सहायक प्राध्यापक | : ४. | (EDU133) बालशिक्षण : कार्यपद्धती |

### निर्मिती

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.


© *२०१६, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.*


**प्रकाशक :** डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२.

**मुद्रक :**

AKOSIS / NB_16_17_24


## प्रास्ताविक

सुप्रिय अध्ययनार्थी बंधु-भगिनी,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी तुम्हाला प्रौढांच्या मानसशास्त्रावर आधारित स्वाध्याय, प्रात्यक्षिक, लेखी परीक्षा यांच्याआधारे तुमचे ह्या शिक्षणक्रमाविषयीचे मूल्यमापन केले जाणार आहे. मूल्यमापनातील सतत मूल्यमापन ही प्रक्रिया या शिक्षणक्रमासाठी मुक्त विद्यापीठाने स्वीकारलेली असल्यामुळे प्रात्यक्षिक कार्य व स्वाध्याय लेखन हे अंतर्गत कार्य अनिवार्य आहे. ज्ञानप्राप्ती व मूल्यमापनाचा आवश्यक भाग म्हणून स्वाध्याय लेखन व प्रात्यक्षिक कार्य करताना या पुस्तिकेचा तुम्हाला अत्यंत उपयोग होईल  असा विश्वास देते. यात काही नवीन सुधारणा सूचवाव्या वाटल्यास त्या शिक्षणक्रम समन्वयकांना अवश्य कळवाव्यात, त्यांचा नक्की विचार होईल आणि पुढील स्वाध्याय पुस्तिकेत उचित सुधारणा करण्यात मदत होईल.

बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (ECCE) शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी तुम्हांस मनःपूर्वक शुभेच्छा!

**डॉ. संजीवनी महाले**
**प्र. संचालक,** शिक्षणशास्त्र विद्याशाखा

> आळस, गर्व, मोह, चंचलपणा, गप्पांचे अड्डे, उद्धटपणा, अभिमान आणि आपणास येत असलेले दुसऱ्यास न सांगण्याची मनोवृत्ती हे अध्ययनार्थीतील आठ दोष आहेत.
>
> **– संवादपत्रिकेवरून**

**मुक्त विद्यापीठातील शिक्षण विकासाचे लक्षण !**

## स्वाध्याय व प्रात्यक्षिकाच्या मुखपृष्ठावरील मजकूर

### यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

स्वाध्याय (Assignment) / प्रात्यक्षिक (Practical)

(१) शिक्षणक्रमाचे नाव : बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम

(२) अभ्यासक्रमाचे नाव : ......................................................................................

(३) अध्ययनार्थीचे संपूर्ण नाव : ..........................................................................

(४) कायम नोंदणी क्रमांक : ................................................................................

(५) पत्ता : ........................................................................................................

(६) दूरध्वनी क्रमांक : ..................................................

(७) ई-मेल : ............................................................

(८) अभ्यासकेंद्राचे नाव : ....................................................................................

(९) अभ्यासकेंद्र सांकेतांक : ............................

(१०) दिनांक : ........................

संमंत्रकांचा शेरा : .............................................................................................

..................................................................................................................................

..................................................................................................................................

स्वाक्षरी /-

दिनांक : ......................    (संमंत्रकाचे नाव)

## *अनुक्रमणिका*


| *अ. क्र.* | *तपशील* | *पृष्ठ क्रमांक* |
|---|---|---|
| १.० | स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य लिहिताना घ्यावयाची काळजी | १ |
| १.१ | गृहपाठाचा / स्वाध्यायाचा उद्देश व महत्त्व | १ |
| १.२ | गृहपाठ / स्वाध्याय लेखनाचे फायदे | २ |
| १.३ | गृहपाठ / स्वाध्याय लिहिताना हे लक्षात ठेवा | २ |
| १.४ | गृहपाठ / स्वाध्याय लिहिताना हे करा | ३ |
| १.५ | गृहपाठ / स्वाध्याय तपासून झाल्यानंतर घ्यावयाची काळजी | ४ |
| १.६ | महत्त्वाच्या सूचना | ४ |
| १.७ | प्रात्यक्षिक अहवाल लेखन नमुना | ५ |
| १.८ | स्वाध्याय व प्रात्यक्षिक यांसाठी प्रश्न | ६ |

# १.० स्वाध्याय व प्रात्यक्षिक कार्य लिहिताना घ्यावयाची काळजी

अध्ययनार्थी बंधु-भगिनींनो, मुक्त विद्यापीठाने सर्व शिक्षणक्रमांसाठी सुरुवातीपासूनच सातत्याने गृहपाठाचा/स्वाध्यायाचा आग्रह धरला आहे. त्याला शिक्षणशास्त्राचा आणि मानसशास्त्राचा आधार आहे. गृहपाठाच्या लेखनाने विद्यार्थी प्रगल्भ होतो, लिखाणाचा वेग वाढतो, विचार करण्याची प्रवृत्ती वाढते. विषयाची गोडी निर्माण होते. त्याचबरोबर परीक्षेच्या दृष्टीने उत्तरलेखनाची तयारीही होते. ह्या शिक्षणक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या शिक्षणक्रमात स्वाध्याय, प्रात्यक्षिक अंतिम लेखी परीक्षा आहे. वरील मूल्यमापनावर आधारित आपला अंतिम निकाल जाहीर करण्यात येतो. या अंतर्गत कार्यात स्वाध्याय व प्रात्यक्षिके घटक आहेत. पैकी स्वाध्याय आणि प्रात्यक्षिक कार्ये ही तुम्हाला स्वतःलाच पूर्ण करावयाची असतात. तुमचा अनुभव व सेवेचा विचार करून त्यांची रचना करण्यात आलेली आहे. त्यात ह्या शिक्षणक्रमातील प्रत्येक विषयाच्या सैद्धांतिक भागावर आधारित, परंतु तुमच्या दैनंदिन कामाशी संबंधित स्वाध्याय देण्यात आलेले आहेत. ज्यांची उत्तरे लेखन वा प्रात्यक्षिक कार्ये तुम्ही सहज करू शकाल. स्वतःच व घरच्या घरी ही कार्ये पूर्ण करावयाची असल्याने तुम्ही ठरवले आणि पुरेसा वेळ दिलात तर ती तुम्ही गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करू शकाल.

गृहपाठ म्हणजे तुमच्या आकलन, संकलन आणि प्रकटीकरण या क्षमतांचे मूल्यमापन होय. स्वयं-अध्ययन पुस्तिका, संपर्कसत्रे आणि संदर्भग्रंथांचे वाचन आणि समजून घेऊन तुम्ही उत्तर किती अचूक स्वरूपात मांडता, हे पाहण्याची पद्धती म्हणजे गृहपाठ हे होय. गृहपाठ मूल्यमापनाचे एक साधन म्हणून हेतुपूर्वक मुक्त विद्यापीठाने विकसित केले आहे.

## १.१ गृहपाठाचा/स्वाध्यायाचा उद्देश व महत्त्व

तुम्ही स्वयं-अध्ययन पुस्तिकेचे वाचन करताना आणि संपर्कसत्रात केवळ श्रवण आणि दृष्टी या दोनच आकलनक्षमतांचा वापर करता. आपण जेवढ्या जास्त ज्ञानेंद्रियांचा आकलनासाठी वापर करू, तेवढ्या जास्त प्रमाणात मानवी मेंदू ज्ञानाचे कायमस्वरूपी संकलन



करतो. मेंदू ज्ञान – अनुभवातील अस्पष्टता, अपूर्णता व अनावश्यक तपशील विस्मृतीत टाकून देतो. मात्र जितक्या अधिक आकलनक्षमतांचा वापर आपण करू, तितके स्मरणही अधिक, हा मानसशास्त्रीय सिद्धान्त आहे. म्हणून आपण श्रवण, स्पर्श, वाचन, लेखन, मनन, चिंतन, अध्ययन, आकलन, संकलन, संयोजन आणि निवेदन या साऱ्या क्षमतांचा पुरेपूर आणि नियोजनबद्ध वापर करावा, यासाठी गृहपाठाचे/स्वाध्यायाचे आयोजन मुक्त विद्यापीठाने आपल्या शिक्षणक्रमात केलेले आहे.

## १.२ गृहपाठ/स्वाध्याय लेखनाचे फायदे

(१) गृहपाठ/स्वाध्याय लिहिल्यामुळे तुमच्या स्मरणशक्तीला चालना मिळते.

(२) गृहपाठ/स्वाध्याय लिहिताना विद्यार्थी अधिक एकाग्र होतो.

(३) गृहपाठामुळे/स्वाध्यायामुळे अभ्यासाची पुनरावृत्ती होते आणि त्यामुळे विस्मृती कमी होते.

(४) परीक्षेत उत्तर लिहिण्यात अधिक नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा, अचूकता आणि काटेकोरपणा येतो.

(५) विद्यार्थ्याला लिखाणातील, मांडणीतील चुका आणि त्रुटींची माहिती होते आणि पुढील गृहपाठ लिहिताना त्या दूर करता येतात. थोडक्यात, आपणाला आपले स्वयं-मूल्यांकन करता येते.

## १.३ गृहपाठ/स्वाध्याय लिहिताना हे लक्षात ठेवा

(१) संबंधित विषयाशी मन एकरूप करा.

(२) अध्ययन करताना आणि समंत्रणाच्या वेळी केलेल्या नोंदी/टिपणांचे अवलोकन करा.

(३) विचारलेल्या प्रश्नाचा आवाका, रोख समजून घेण्यासाठी त्यावर चिंतन करा.

(४) संदर्भग्रंथांमधून अधिक माहिती मिळवून उत्तराचे योग्य प्रकारे निवेदन करा.

(५) गृहपाठ/स्वाध्याय लिहिताना इतर विचार प्रयत्नपूर्वक बाजूला सारा.

(६) गृहपाठ/स्वाध्याय लिहिताना अक्षराची प्रमाणबद्धता, योग्य ठिकाणी परिच्छेद पाडणे तसेच शेवटपर्यंत अक्षराचा दर्जा टिकवणे याची प्रयत्नपूर्वक सवय करा.

(७) गृहपाठ/स्वाध्याय लिहिताना लेखनसाहित्य (पेन, पेन्सिल, स्केल, कागद इत्यादी.) हाताशी ठेवा. पेन पूर्ण शाई भरलेला, पेन्सिल व्यवस्थित टोक केलेली असावी. अन्यथा मध्येच शाई संपल्यावर शाई भरणे, आकृती काढण्याची वेळ आली की पेन्सिलला टोक करत बसणे, मध्येच इतर कामे करणे हे गृहपाठ लेखनात होणारे दोष आहेत; ते प्रयत्नपूर्वक टाळावेत.

(८) गृहपाठ/स्वाध्याय शक्यतो एका बैठकीतच लिहावा. चार ओळी लिहून पाणी पिणे, पुन्हा जेवून घेणे, अर्धवट प्रश्न सोडून थोडी कामे करणे या गोष्टी टाळा. गृहपाठ/स्वाध्याय पूर्ण झाल्याशिवाय उठू नका.

(९) गृहपाठ/स्वाध्याय लेखन आपल्या पद्धतीने करावे. इतरांचे गृहपाठ/स्वाध्याय जसेच्या तसे लिहू नयेत. यामुळे आपलाच तोटा होतो. अंतिम मौखिक (viva) परीक्षेत आपणांस प्रश्नाचे उत्तर व्यवस्थित देता येणार नाही.

(१०) तुम्ही लिहिलेला गृहपाठ/स्वाध्याय परीक्षकांना तपासताना वाचता येईल, याचे भान ठेवून आपले हस्ताक्षर किमान सुवाच्य आणि वळणदार काढण्याचा प्रयत्न करा. यामुळे परीक्षकांचे तुमच्याबद्दलचे मत अनुकूल होते. यासाठी शाईचा पेन वापरा.

(११) गृहपाठातील/स्वाध्यायातील आकृत्या पेन्सिलने सुबक व नामनिर्देशित काढाव्यात.

## १.४ गृहपाठ/स्वाध्याय लिहिताना हे करा

(१) गृहपाठ/स्वाध्याय लिहिताना कागदाच्या सुरुवातीला गृहपाठ क्रमांक, विषयाचे नाव, तुमचे संपूर्ण नाव, कायम नोंदणी क्रमांक, अभ्यासकेंद्राचे नाव, तुमचा पत्ता, अभ्यासक्रम (विषय) आणि दिनांक लिहावा.

(२) उत्तर लिहिण्याआधी प्रश्न पूर्ण लिहा.

(३) कागदाच्या डाव्या बाजूला योग्य समास सोडावा.

(४) अक्षरांची उंची, वळण एकसारखे ठेवा.

(५) उत्तर लिहून संपल्यावर सरळ रेषा ओढा व नंतर दुसरा प्रश्न लिहा.



(६) गृहपाठ/स्वाध्याय लिहिल्यानंतर तो स्वतःच वाचून पाहा. एखादा मुद्दा विसरला का ते पाहा. मात्र या वेळी कोणत्याही खुणा करू नका. एखादा काना, मात्रा, अनुस्वार विसरून राहिल्यास तो व्यवस्थित करा.

## १.५ गृहपाठ/स्वाध्याय तपासून झाल्यानंतर घ्यावयाची काळजी

गृहपाठ मार्गदर्शक/परीक्षकांकडून तपासून परत मिळाल्यावर त्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन पुढील गृहपाठ लिहिताना करा. यापूर्वीच्या चुका पुन्हा होणार नाहीत, याची दक्षता घ्या. त्यात काही शंका असल्यास संमंत्रकांकडून सोडवून घ्या. गृहपाठ हे अभ्यासाचे उत्तम साधन आहे. याचा उपयोग तुम्हाला परीक्षेतील अडचणींपासून दूर ठेवण्यासाठी नक्की होईल असा विश्वास देतो.

## १.६ महत्त्वाच्या सूचना

(१) स्वाध्यायाचे प्रश्न हे प्रामुख्याने उपयोजनात्मक पद्धतीचे प्रश्न असतात. अध्ययनार्थींनी स्वयं-अध्ययन पुस्तिकेचे वाचन करून, संपर्कसत्रातील नवीन मुद्दे व त्यांचा दैनंदिन शैक्षणिक व्यवस्थापनात झालेला प्रत्यक्ष उपयोग आणि अध्ययनार्थीचे स्वतःचे चिंतन या साऱ्या क्षमतांचा पुरेपूर उपयोग करून स्वाध्याय लिहिणे अपेक्षित आहे. अशा स्वरूपाचे स्वाध्याय प्रत्येक अभ्यासक्रमावर अध्ययनार्थी घरी लिहून अंतिम संपर्कसत्रापूर्वी एक महिना अभ्यासकेंद्रावर सादर करतील.

स्वाध्यायाचे मूल्यमापन करताना अध्ययनार्थीने केलेली उपयोजनात्मक व चिंतनात्मक मुद्द्यांची मांडणी मध्यवर्ती मानून पुढीलप्रमाणे गुणदान करण्यात येईल-

(अ) समर्पक शब्दांत केलेले प्रास्ताविक

(आ) विषय विस्तार व स्वाध्यायाच्या उत्तराचे उपमुद्दे व उपयोजनात्मक स्वतःचे चिंतनासह

(इ) उचित समारोप

(ई) उत्तरलेखनातील सृजन, टापटीपपणा, लेखन शुद्धता इ.

(२) **प्रात्यक्षिके** : अध्ययनार्थींच्या कृतियुक्त अंगाची तपासणी करणे हा प्रात्यक्षिकाचा मुख्य उद्देश आहे. एखाद्या शैक्षणिक क्षमतेवर अध्ययनार्थीचे प्रभुत्व प्राप्त झाले आहे किंवा नाही ह्याचे प्रात्यक्षिकावर मूल्यमापन करण्यात येईल.

ह्या शिक्षणक्रमासाठी प्रात्यक्षिके अध्ययनार्थीने घरी / केंद्रावर तयार करावयाची असतात. त्यासाठी स्वयं-अध्ययन पुस्तिका, दैनंदिन शैक्षणिक व्यवस्थापनातील अनुभव आणि सर्जनशीलता ह्यांचा वापर करून ते प्रात्यक्षिक तयार करावे. त्यांचे मूल्यमापन पुढीलप्रमाणे करण्यात येईल.

(अ) प्रात्यक्षिक तयार करताना वापरलेली सूक्ष्म अचूकता

(आ) प्रात्यक्षिकात केलेला सर्जनशीलतेचा वापर

(इ) अहवाल लेखनातील टापटीपपणा, वक्तशीरपणा व सुटसुटीतपणा

**तसेच स्वाध्याय व प्रात्यक्षित अहवाल लेखनात–**

**(१) नव्या योजना, (२) कल्पकता, (३) अनुभव, (४) नवीन संकल्पनाचे आकलन, (५) मांडणी, (६) संदर्भाचा उचित उल्लेख, (७) विधायक सूचना, (८) नवविचार, इत्यादींचा समावेश असावा.**

## १.७ प्रात्यक्षिक अहवाल लेखन नमुना

### प्रास्ताविक

विद्यार्थ्यांनी ज्या विषयासाठी प्रात्यक्षिक लेखन घेतलेले आहे त्या प्रात्यक्षिकाची पार्श्वभूमी थोडक्यात विशद करावी.

### (क) उद्दिष्टे

प्रात्यक्षिकांमधून कोणकोणती उद्दिष्टे साध्य केली जाणार आहेत? त्यांचा उल्लेख करावा.



### (ख) प्रात्यक्षिकाची कार्यपद्धती

संपूर्ण कार्यपद्धतीची सविस्तर माहिती द्यावी. त्यात पुढील बाबींचा समावेश असावा.

(१) **पूर्वतयारी** : प्रात्यक्षिकासाठी केलेल्या पूर्वतयारीची माहिती देण्यात यावी.

(२) **प्रात्यक्षिक कार्यवाही पात्रता/कृती** : प्रात्यक्षिक तयार करताना ज्या ज्या कृती केल्या त्यांची क्रमवार माहिती द्यावी.

### (ग) प्रात्यक्षिकांच्या उपयुक्ततेबाबत स्वतःचे मत

(१) संस्थेला/शाळेला होणार फायदे

(२) स्वतःला होणारे फायदे

(**सूचना** : प्रात्यक्षिकाचा व स्वाध्यायाचा अहवाल स्वतःच्या सुवाच्य अक्षरात लिहिलेला असावा)

## १.८ स्वाध्याय व प्रात्यक्षिक यांसाठी प्रश्न

### (१) EDU 131 : बालविकासाची मूलतत्वे, बालविकास व बालमानसशास्त्र *(खालीलपैकी कोणतीही चार प्रश्न सोडवा)*

(१) जीन पिआजे यांचे बालशिक्षणातील कार्य आणि बालशिक्षणातील योगदान लिहा. (५ गुण)

(२) बालमानसशास्त्राचा अर्थ, उद्देश व व्याप्ती लिहा. (५ गुण)

(३) अध्ययन म्हणजे काय ते सांगून बालकाच्या विविध प्रवृत्ती कोणत्या ते लिहा. (५ गुण)

(४) बालकाच्या भाषिक विकासावर परिणाम करणारे घटक कोणते ते लिहा. (५ गुण)

(५) सामाजिक परिक्वतेची संकल्पना स्पष्ट करून बालकांना नकारात्मक स्वरूपाची जाणिव कशी करून द्याल ते लिहा. (५ गुण)

## (२) EDU 132 : बालशिक्षण : आहार व आरोग्य *(खालीलपैकी कोणतीही चार प्रश्न सोडवा)*

(१) आरोग्यास पोषक बाबी कोणत्या ते सांगून आरोग्याचे महत्त्व स्पष्ट करा. (५ गुण)

(२) बालकाच्या आरोग्य संवर्धनात बालसेविकेची भूमिका स्पष्ट करा. (५ गुण)

(३) बालकांच्या वाढीचे टप्पे सांगून वाढ आणि विकास यातील परस्पर संबंध स्पष्ट करा. (५ गुण)

(४) बालकांना ॲलर्जी कशामुळे होते? ते सांगून ॲलर्जी टाळण्यासाठी पाच उपाय सूचवा. (५ गुण)

(५) कुपोषित बालकांचे लक्षणे कोणती ते सांगून त्यावर उपाय सूचवा. (५ गुण)

## (३) EDU 133 : बालशिक्षण कार्यपद्धती *(खालीलपैकी कोणतीही चार प्रश्न सोडवा)*

(१) बालवाडीमध्ये विविध उपक्रमाचे आयोजन करताना कोणती काळजी घ्यावी असे तुम्हाला वाटते ते लिहा. (५ गुण)

(२) बालकाच्या श्रवण कौशल्याचा विकास करण्यासाठी विविध उपक्रम सूचवून कोणत्याही एका उपक्रमाचे आयोजन कसे कराल ते लिहा. (५ गुण)

(३) बालकांच्या वर्तनाला योग्य वळण लावण्यासाठी बालसेविकेची भूमिका कोणती ते स्पष्ट करा. (५ गुण)

(४) जीवन व्यवहाराची व्याख्या सांगून जीवन व्यवहार कामाचे विविध प्रकार कोणते ते स्पष्ट करा. (५ गुण)

(५) बालकाच्या सर्जनशीलतेच्या विकासासाठी मुक्त खेळांची आवश्यकता काय ते सोदाहरण स्पष्ट करा. (५ गुण)



## (४) EDU 134 : बालशिक्षणाचे व्यवस्थापन व मूल्यमापन *(खालीलपैकी कोणतीही चार प्रश्न सोडवा)*

(१) व्यवस्थापन म्हणजे काय ते सांगून बालसेविकेची व्यवस्थापनातील भूमिका विशद करा. (५ गुण)

(२) भौतिक सुविधेचे स्वरूप सांगून भौतिक सुविधांमध्ये समाविष्ट होणारे घटक कोणते ते लिहा. (५ गुण)

(३) मानवी संबंध व्यवस्थापनात बालसेविकेची भूमिका स्पष्ट करा. (५ गुण)

(४) बालवाडीचे अल्पकालीन आइण दीर्घकालीन नियोजन कसे कराल ते लिहा. (५ गुण)

(५) बालवाडीत नोंदी ठेवण्याची गरज व महत्त्व कोणते ते लिहा. (५ गुण)

## प्रात्यक्षिक यादी

(१) **EDU 131 :** (१) शारीरिक – कारक विकास, (२) बौद्धिक विकास

(२) **EDU 132 :** (३) सामाजिक – भावनिक विकास, (४) पौष्टिक पदार्थ तयार करणे (५) कुपोषित मुल ओळखणे

(३) **EDU 133 :** (६) बालकाशी संवाद, (७) खेळ, गाणी व गोष्टी यांचा संग्रह करणे

(१) **EDU 134 :** (८) पालक सभा. (९) वार्षिक नियोजन

## स्वाध्याय/प्रात्यक्षिकांच्या दुसऱ्या पृष्ठावरील
## अध्ययनार्थींची स्वयं-प्रतिज्ञा

मी माझा अभ्यास स्वयं-अध्ययन पद्धतीने नियमित करीन. दररोज प्राप्त होणाऱ्या फावल्या वेळेचा मी स्वयं-अध्ययनासाठी काटेकोरपणे उपयोग करीन. स्वयं-अध्ययन करताना येणारे प्रश्न / समस्यांची नोंद पुस्तकावरच दिलेल्या समासात त्याच वेळी करीन. समस्या / प्रश्न माझ्या अध्ययनार्थी बंधु-भगिनींना विचारीन, जर त्यांनाही समस्या सोडविता आली नाही तर संपर्कसत्राच्या दिवशी संमंत्रकांना विचारीन. त्यानंतर मी स्वतः स्वाध्याय वाचन, मनन व चिंतन करून स्वाध्यायाचा प्रश्न नीट समजून घेऊन त्याचे उत्तर मी स्वतःच घरी लिहीन. लेखनाबरोबरच त्यातून चित्रे, आकृत्या, आलेख काढीन.

मी स्वाध्याय व प्रात्यक्षिक लिहिण्यासाठी पुरेसा वेळ देईन.

मी दररोज कमीतकमी तीन-चार तास तरी अभ्यासाला वेळ देईन. मी स्वयं-अध्ययनाचे, दैनंदिन कार्यानंदाचे आणि कौटुंबिक कार्यानंदाचे वेळापत्रक तयार करीन व त्यांचे तंतोतंत पालन करीन, अशी प्रतिज्ञा घेतो.

*(**सूचना-** ही प्रतिज्ञा अध्ययनार्थीने स्व-हस्ताक्षरात लिहावी.)*

अध्ययनार्थीची स्वाक्षरी

नाव : ..........................................................................................

कायम नोंदणी क्रमांक : ......................................................................

दिनांक : ......................................................................